ज्ञानदीप लावू जगी

# पुणे नगर वाचन मंदिर

स्थापना : ७ फेब्रुवारी १८४८

email : pnvm1848@gmail.com
www.punenagarvachan.org

पुस्तकाचे नाव : जॉन रस्कीन

लेखक : परशराम हरी बर्वे

प्रकाशक : अनंत विनायक पटवर्धन, पुणे

प्रकाशन वर्ष : १९२३

मूळ ग्रंथ प्रत : शिक्षण प्रसारक मंडळी, पुणे

पुणे नगर वाचन मंदिर

अंकेक्षण (डिजीटायझेशन) प्रकल्प

अंकेक्षण रुपांतर - २०२३

# जॉन रस्कीन.

820.92
Rus-Bar

लेखक

परशराम हरी बर्वे, बी. ए. (ऑनर्स.)

२६९
820.92
Rus/Bar
2922


ग्रंथ संग्रह

पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

१९२३.

किंमत चार आणे

2800



जॉन रस्कीन.

# जॉन रस्कीन.

ज्या विद्वद्रत्नानें आपल्या लेखनकौशल्यानें एकोणिसाव्या शतकांतील साहित्यभक्तांत अग्रस्थान मिळविलें ज्यानें आपल्या विद्वत्ताप्रचुर लेखांमुळें व उत्साहजनक व्याख्यानांच्या योगानें आंग्लजनतेस उद्योगप्रिय करून त्यांस अखिल मानवजातीबद्दल बंधुभाव ठेवण्यास प्रवृत्त केलें; ज्यानें हल्लींच्या अर्थशास्त्रांतील चुकीच्या तत्त्वामुळें राष्ट्रावर कसा अनर्थ ओढवतो, व गरीब लोकांची स्थिति किती शोचनीय होत जाते ह्याचें सर्वांस ज्ञान करून दिलें; ज्यानें सतत पन्नास वर्षें अर्थशास्त्र, साहित्य, वाङ्मय, शिल्पशास्त्र, चित्रकला, गायन, वगैरे विविध विषयांवर अनेक ग्रंथ लिहून इंग्लिश वाङ्मयांत उत्तमोत्तम पुस्तकांची भर घातली; व ज्या महान् साहित्यपंडितास त्याच्या उत्साहजनक व विचारपरिप्लुत व्याख्यानांमुळें 'गद्यकवि' असें मोठ्या गौरवानें म्हणण्यांत येतें, त्या प्रतिभावान् पुरुषाच्या—जॉन रस्कीन यांच्या—जीवनवृत्ताशीं वाचकांचा अल्प परिचय करून देण्याचें योजलें आहे.

जॉन रस्कीन यांचा जन्म सन १८१९ सालच्या फेब्रुआरीच्या ८ व्या तारखेस लंडन शहरीं झाला त्यांचे वडील जेम्स रस्कीन हे मूळचे स्कॉटलंडचे रहिवासी

ते मोठे विद्याव्यासंगी गृहस्थ होते. त्यांची पत्नी मार्गारेट बाई ह्या त्यांच्यापेक्षां चार वर्षांनीं वडील होत्या. मार्गारेट बाईला ग्रंथवाचनाचा व ग्रंथश्रवणाचा मोठा नाद असे. बायबलवर त्यांची फार श्रद्धा होती. जॉन चार वर्षांचा असतांना ही सर्व मंडळी लंडन शहर सोडून 'हर्नेहिल' गांवीं रहावयास गेली.

'हर्नेहिल' येथें असतांना छोटा जॉन बालार्काच्या कोमल किरणांकडे पाहून त्यांचें वर्णन लिही, व आपण लिहिलेले कागद आपल्या आईबापांस वाचून दाखवी. तींही मोठ्या आनंदानें आपल्या लहानग्या जॉननें लिहिलेलें वर्णन ऐकत. त्याचे लेखनप्रयत्न अगदीं लहानपणींच सुरू झाले होते असें म्हणावयास हरकत नाहीं. मार्गारेट बाई आपल्या मुलाचा लेखनकलेकडे कल असलेला पाहून त्यास उत्तेजन देत. त्या स्वभावानें फार प्रेमळ होत्या, पण मुलांकडून नेमलेलें काम करून घेण्यांत त्या फार दक्ष असत. जॉनला दररोज सकाळीं गणित शिकावें लागे व बायबलमधील भाग पाठ करावा लागे. त्याचा हा रोजचा अभ्यास झाल्यावर त्यास खेळण्याची वगैरे पूर्ण मुभा असे. जॉन एकटा असला म्हणजे तो बंगल्याच्या भोंवतालीं असलेल्या बागेमध्यें जाई व तेथील फुलझाडांशीं खेळत बसे.

अशाप्रकारें सकाळचा कार्यक्रम झाल्यावर दुपारीं जेम्ससाहेब आपल्या कामावरून परत येत. मग दुपारचें

जेवण होई. नंतर सर्व मंडळी दिवाणखान्यांत जमे. या ठिकाणीं जेम्ससाहेब आपल्या पत्नीला आपल्या आवडीच्या पुस्तकांतील कांहीं भाग वाचून दाखवीत. त्या वेळेस छोटा जॉन कोंपऱ्यांत असलेल्या खुर्चीवर बसून वडील जें वाचीत तें लक्षपूर्वक ऐके. अशा रीतीनें अगदीं लहान असतांनाच स्कॉट, शेक्सपियर, होमर, पोप वगैरे विख्यात ग्रंथकाराचे ग्रंथ ऐकण्याची संधि त्याला मिळाली. दर रविवारीं 'रॉबिनसन क्रूसो' व 'पिलग्रिम्स प्रोग्रेस' हीं पुस्तकें वाचण्याचा त्या कुटुंबांत परिपाठ असल्यामुळें जॉनला अनायासें तींही पुस्तकें ऐकण्याची संधि मिळाली. जॉन लहान असतांनाच स्कॉटच्या वीररसपरिप्लुत कादंबऱ्यांच्या व काव्यांच्या श्रवणानें त्याची कल्पनाशक्ति विकास पावली व बायबल-च्या अध्ययनानें नीट विचार करण्याची संवय त्याला लागली. शेक्सपियर, होमर, मिल्टन वगैरे ग्रंथकारांच्या उत्तमोत्तम ग्रंथांशीं त्याचा मुळापासूनच परिचय झाल्यामुळें त्याची वाङ्मयविषयक आवड उत्तरोत्तर वाढत गेली. ह्या गृहशिक्षणाचा त्याच्या मनावर चांगलाच परिणाम झाला. जॉनचें घर म्हणजे प्रेम व शांति यांचें निवासस्थानच होतें. जॉनला मोठेपणीं आपल्या ह्या लहानपणाच्या मजेदार दिवसांची आठवण झाली म्हणजे गहिंवरून येत असे.

जेम्स रस्कीन यांना इतिहासप्रसिद्ध स्थळें, सृष्टिसौंदर्याचे देखावे वगैरे पाहण्याची फार आवड होती, व आपल्या

पत्नीस व मुलास घेऊन ते अशा प्रकारचीं स्थळें पाहावयास उन्हाळ्याच्या सुटींत जात असत. त्यांचा प्रवास सावकाश होत असल्यामुळें ठिकठिकाणचीं ऐतिहासिक स्मारकें, प्रेक्षणीय देखावे, व शिल्पकलेचे कोरींव नमुने सर्व मंडळीस नीटपणें पहावयास मिळत. जेम्ससाहेबांस आपण पाहिलेल्या प्रेक्षणीय स्थळांचें टिपण करून घेण्याची संवय असल्यामुळें छोट्या जॉनला ती संवय लागली. नामांकित चित्रकारांच्या उत्तमोत्तम कृति, व शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने त्यास ठिकठिकाणीं पहावयास मिळाल्यामुळें त्याची जिज्ञासा वाढत गेली. अशा रीतीनें अगदीं लहानपणापासूनच सूक्ष्म निरीक्षण करण्याचें त्यास शिक्षण मिळाल्यामुळें मोठेपणीं इतिहासप्रसिद्ध व्हीनस व फ्लारेन्सचीं सर्व जगास थक्क करून टाकणारीं वर्णनें लिहिण्यास तो समर्थ झाला.

जॉन चौदा वर्षांचा असतांना जेम्ससाहेब सर्व मंडळीसह स्वित्झर्लंड व इटलीच्या प्रवासास गेले. ह्या लहानपणीं केलेल्या प्रवाससंबंधानें जॉन आपल्या 'व्हेनीसमधील शिला' ह्या ग्रंथामध्यें म्हणतो, "हिमाच्छादित आल्पस् पर्वताच्या दर्शनानें माझ्यामध्यें नवजीवनाचा संचार झाला; व असें वाटूं लागलें कीं, ह्या शुभ्र पर्वताच्या शिखरावरून कधींच परत फिरूं नये. आल्पस् पर्वताच्या देखाव्याप्रमाणें भव्य देखावा इतर कोठें असेल असें मला वाटत नाहीं. त्या पर्वतावरील सर्वच वस्तुजात मला प्रिय वाटतें. ह्या धवलगिरीच्या दर्शनापुढें

स्वर्गातील सिंहासनाचें दर्शनही तुच्छ होय." दुसरे एके स्थळीं इतिहासप्रसिद्ध वॉरिक किल्ल्यासंबंधानें तो म्हणतो, "वॉरिक किल्ल्यांतील दिवाणखान्यांत राहून त्या भव्य किल्ल्याच्या दर्शनास मुकण्यापेक्षां किल्ल्याच्या बाहेर एखाद्या झोंपडींत राहून त्या भव्य किल्ल्याकडे एकसारखें पाहात राहाणें मला अधिक आवडेल."

अशाप्रकारें वारंवार प्रवासाचे योग आल्यामुळें जॉनच्या शिक्षणास विविधता आली. लेखनकलेंतही त्याची प्रगति होत होतीच. तो सात वर्षांचा असतांनाच त्यानें उन्हाळ्याच्या सुट्टींत केलेल्या प्रवासाचें वर्णन 'हॅरी व ल्युसी' ह्या नावानें लिहिलें होतें. आपल्या मुलाचा लेखन-कलेकडे असलेला कल पाहून त्यास ह्या कामीं उत्तेजन मिळावें म्हणून मार्गारेट बाई त्यास त्यानें लिहिलेल्या प्रत्येक पानाबद्दल एक शिलिंग बक्षिस देत असत. अशाप्रकारें अगदीं लहान असतांनाच त्यानें लिहिलेले हस्तलिखित कागद एकत्र बांधविले होते. ते अद्यापि बॅटवुड येथें पाहावयास मिळतात. जॉन आठ वर्षांचा झाल्यावर कविता करूं लागला व आपल्या वयाच्या दहाव्या वर्षी त्यानें पित्याच्या वाढदिवसाचे वेळीं वाचण्यासाठीं वॉटरलूच्या लढाईवर एक संवादात्मक भाषण लिहिलें.

जॉनचें लहाणपणांतील शिक्षण त्याच्या मातेच्या हाताखालीं व खाजगी शिक्षकाकडून झालें. तो चौदा

वर्षांचा होईपर्यंत शाळेंत असा कधींच गेला नाहीं. जेम्स रस्कीन यांस चित्रकलेचा बराच नाद असे. 'टर्नर' नांवाच्या नामांकित चित्रकाराचीं चित्रें त्यांना फार आवडत. आपल्या मुलाला चित्रकलेची माहिती असावी म्हणून तो बारा वर्षांचा असतांना त्याला चित्रकला शिकविण्यासाठीं एक शिक्षक ठेवण्यांत आला व थोड्याच दिवसांत जॉनची ह्या कलेंत बरीच प्रगति झाली. त्याच्या तेराव्या वाढदिवशीं जेम्ससाहेबांनीं त्याला 'रॉजर्स इटली' नांवाचें सचित्र पुस्तक बाक्षिस दिलें. ह्या पुस्तकामध्यें टर्नरचीं बरींच चित्रें असून तीं त्यास फारच आवडलीं, व हें शिक्षण 'आधुनिक चित्रकार' हा ग्रंथ त्याचे लेखणींतून उतरविण्यास कारणीभूत झालें. सन १८३६ सालीं जॉन सतरा वर्षांचा असतांना नेपल्स-मधील गोष्ट हा त्याचा पहिला लेख प्रसिद्ध झाला.

आपल्या मुलानें धर्मोपदेशक व्हावें अशी त्याच्या आईची फार इच्छा होती. धर्मोपदेशकाचा व्यवसाय म्हणजे त्या वेळीं मोठ्या मानाचा मानण्यांत येत असे. आपल्या मातेच्या हाताखालीं त्यानें सर्व बायबल मुखोद्गत केलें होतें; व म्हणूनच बायबलमधील सुंदर सुंदर प्रमेयें त्याच्या लेखांत जागोजाग आढळतात. पण नुसत्या बायबलच्या अध्ययनापेक्षां त्यास इतर गोष्टींचेंही ज्ञान प्राप्त व्हावें म्हणून त्यास एका जवळच्या शाळेंत घालण्यांत आलें व त्या ठिकाणीं प्रवेशपरीक्षेस बसण्याइतकी त्याची तयारी झाली. सन १८३६

सालीं तो ही परीक्षा पास झाल्यावर त्यास ऑक्सफर्ड येथील 'ख्राइस्टचर्च कॉलेज' मध्यें घालण्यांत आलें. येथें असतांनाही त्याचे लेखनप्रयत्न चालूच होते. ह्या सुमारास टर्नर ह्या चित्रकाराच्या कृतीवर ब्लॅकवुड मासिक पुस्तकामध्यें एका टीकाकारानें हल्ला केला होता. ह्या टीकेस उत्तर म्हणून त्यानें त्याच मासिक पुस्तकाकडे एक लेख पाठविला; परंतु तो प्रसिद्ध झाला नाहीं.

ऑक्सफर्ड येथें असतांना त्यानें पुष्कळ सहाध्यायांशीं मैत्री संपादन केली, व हेरोडोटिस, प्लेटो वगैरे तत्त्ववेत्त्यांचे ग्रंथ वाचले. प्लेटोचे ग्रंथ वाचून त्याच्या मनावर झालेले परिणाम त्याच्या समाजशास्त्र व अर्थशास्त्र यांवरील ग्रंथांत दिसून येतात. जॉनचा लहानपणापासूनच खेळण्याकडे ओढा नसल्यामुळें कॉलेजमध्यें असतांना देखील तो कधीं खेळतांना किंवा शुष्क वाद करतांना आढळून येत नसे. तो नेहमीं एखादें पुस्तक घेऊन वाचीत बसलेला किंवा बागेंतील फुलझाडांचें निरीक्षण करीत असलेला दिसावयाचा. त्याचें वाचन अभ्यासाच्या पुस्तकांपुरतेंच नसून विविध असल्यामुळें त्यास कॉलेजमधील स्कॉलर्शिप मिळवितां आली नाहीं.

मार्गारेट बाईची आपल्या मुलावर फारच ममता होती. ती इतकी कीं, आपल्या मुलावर आपलें लक्ष असावें म्हणून त्या 'हर्नेहिल' येथून ऑक्सफर्ड येथें राहावयास आल्या. जेम्ससाहेबही दर आठवड्यास आपल्या मुलाच्या समाचारास

येत असत; व दर रविवारीं ही सर्व मंडळी सेंट पीटरच्या देवळांत प्रार्थनेस जात.

ऑक्सफर्डमध्यें असतांना जॉननें लंडनमधील शिल्पकला-विषयक मासिकपुस्तकामध्यें ' शिल्पकलेंतील काव्य ' ( Poetry of Architecture ) ह्या विषयावर ' काटा पुशिन ' या टोपण नांवानें एक लेखमाला लिहिली व ह्या लेखमालेमुळेंच त्याची ' मार्मिक टीकाकार ' म्हणून प्रसिद्धी झाली. या लेखमालेचा तेथील विद्वान् मंडळीवर विलक्षण परिणाम झाला. मोठमोठ्या विद्वानांस असें वाटलें कीं, ही लेखमाला 'ऑक्सफर्डमधील एखाद्या मर्मज्ञ शास्त्रज्ञाच्या लेखणींतून बाहेर पडली असावी. एडिंबरो शहरीं तर एक मोठी सभा भरविण्यांत येऊन स्कॉटलंडमधील शिल्पकलेच्या अप्रतिम नमुन्यांबद्दल आपलें मत देण्यासाठीं ' शिल्पकलें-तील काव्य ' ह्या लेखमालेच्या लेखकास मोठ्या आदरानें आमंत्रण करण्यांत आलें. हा त्याचा कीर्तिलाभ म्हणजे त्याच्या पुढील कीर्तीचा व यशोगौरवाचा भक्कम पायाच होय. जॉननें ह्या लेखमालेंतील पहिला लेखांक लिहिला त्या वेळेस हा लेखक पुढें साहित्यक्षेत्रांतील अढळ तारा होईल असें भाकित, तो लेख प्रसिद्ध करणाऱ्या मासिकपुस्तकाच्या संपादकानें जेम्स रस्कीन यांना पाठविलेल्या खाजगी पत्रांत केलें होतें.

कॉलेजमध्यें प्रो. ऑकलंड यांच्याशीं जॉनची असलेली मैत्री आमरण कायम राहिली. त्या वेळेस सर्व इंग्लंडभर

नवीन विचारांच्या व नवीन ध्येयांच्या लाटांवर लाटा येत होत्या. त्यांचा कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या मनावर तात्काळ परिणाम होत असे. परंतु जॉनचा स्वभाव शांत असल्यामुळें व प्रत्येक गोष्ट पूर्ण विचारांतीं करण्याची त्याची पद्धति असल्यामुळें त्याच्या मनावर ह्या लाटांचा फाजील परिणाम मुळींच झाला नाहीं. कॉलेजमध्यें असतांना तो शिल्पकला, चित्रकला वगैरे विषयांवरीलच ग्रंथ वाची असें नव्हे, तर वाङ्मय, इतिहास व तत्त्वज्ञान वगैरे विविध विषयांवरील ग्रंथही त्यानें वाचले होते. बायबलवर त्याची श्रद्धा व भक्ति अढळ होती. ती अंधश्रद्धा नसून खरी श्रद्धा होती. बायबल-मधील उत्तमोत्तम उपदेश आपल्या हृत्पटलावर खोदून ठेवा-वयाचा व त्या उपदेशाप्रमाणें आपलें वर्तन ठेवावयाचें असा त्याचा निश्चय असे. बेकन, ॲरिस्टॉटल, प्लेटो वगैरे विद्वान् लोकांच्या ग्रंथांशीं त्यानें परिचय करून घेतला होता; व हें सर्व साहित्यशिक्षण चालूं असतांना सभोंवार असणाऱ्या हिरव्या टेंकड्या, सपाट मैदानें, सुंदर फुलझाडें व मौजेनें आनंदानें बागडणारे निर्झर, वगैरे सृष्टिसुंदरीचे मनोहर अलं-कार पाहण्याच्या, व ह्या नैसर्गिक वस्तूंचें टर्नर, रेनॉल्ड वगैरे नामांकित चित्रकारांच्या उत्तमोत्तम कृतींत पडलेलें प्रतिबिंब पाहाण्याचा, किंवा वर्ड्स्वर्थ, बायरन, होमर, स्कॉट वगैरे कवींच्या काव्यांत ह्या नैसर्गिक चमत्कारांचें शब्दचित्र पाह-ण्याचा त्याचा व्यवसाय सतत चालू होता.

पूर्वीं सांगितलेंच आहे कीं, जॉननें आपल्या वयाच्या १७ व्या वर्षीं प्रसिद्ध चित्रकार टर्नर याच्या समर्थनासाठीं एक लेख लिहिला, पण तो प्रसिद्ध झाला नाहीं. या लेखाच्या धोरणानेंच आपण एक स्वतंत्र ग्रंथ लिहावा, असा विचार करून त्यानें 'आधुनिक चित्रकार' (Modern Painters) हा ग्रंथ लिहिण्याचें योजिलें. या ग्रंथास प्रथमतः 'टर्नर व प्राचीन चित्रकार' असें नांव त्यानें दिलें होतें; परंतु हॅरिसन नामक विद्वान् गृहस्थाच्या सूचनेवरून तें नांव बदलून त्यास 'आधुनिक चित्रकार' असें दुसरें व्यापक नांव त्यानें दिलें.

टर्नरचीं चित्रें सृष्टींतील मनोवेधक देखाव्यांचीं असत. अरुणोदय, सूर्यास्त, मेघमाला वगैरे त्याच्या उत्तम चित्रांवर 'ब्लॅकवुड' मासिक पुस्तकामध्यें एका टीकाकारानें निर्दयपणें हल्ला केला होता. जॉन रस्कीन यांस हें न आवडल्यामुळें त्यांनीं वरील ग्रंथ लिहिण्याचें मनांत आणिलें. 'आधुनिक चित्रकार' ह्या ग्रंथाच्या पहिल्या भागांत ते म्हणतात, "जर तुम्हांस सृष्टिसौंदर्यांतील खरें मर्म पाहावयाचें असेल, तर निसर्गाकडे प्रामाणिकपणें पहा, सृष्टीशीं तादात्म्य व्हा. आपल्या अंतःकरणांतील सर्व पूर्वग्रह दूर करून ज्या वेळेस सृष्टीचें तुम्ही निरीक्षण कराल त्या वेळेसच सृष्टिसौंदर्याचें खरें रहस्य तुम्हांस समजेल. चित्र-कला म्हणजे नुसतें रंगाचें मिश्रण करून काढतां येणारी

कला नसून तिच्यामध्यें उच्चतमं असें कांहीं तरी आहे; चित्रकला म्हणजे एक प्रकारची मूकभाषाच आहे; तिच्यांतील गुप्त संदेश ग्रहण करावयाचा असल्यास आपलें तिच्याशीं तादात्म्य झालें पाहिजे. ज्या चित्रकारांच्या कृतीमध्यें अशा प्रकारचा गुप्त संदेश अधिक व्यक्त केलेला असतो तोच चित्रकार उत्तम होय. टर्नरच्या चित्रामध्यें अशा प्रकारचा मूकसंदेश विशेष रीतीनें व्यक्त केलेला असल्यामुळें तो एक उत्तम चित्रकार आहे. ”

रस्कीनसाहेबांनीं आपल्या या ग्रंथाच्या पहिल्या भागांत तीन सिद्धांत मुख्यतः प्रस्थापित केलेले दिसतात. ते हेः—

( १ ) निसर्गाशीं तादात्म्य होऊन काढलेल्या चित्रामध्येंच सृष्टीचा मूकसंदेश स्पष्टपणें व्यक्त केला जातो. चित्रकला म्हणजे ठळक रेघांच्या मिश्रणानें आपल्या डोळ्यांना भूल पाडावयास लावणारी कला नसून सृष्टीचा संदेश कळविणारी एक मूकभाषाच होय.

( २ ) चित्रकला म्हणजे उच्च ध्येय आपल्या मनावर पूर्णपणें बिंबविण्याचें एक साधनच होय.

( ३ ) ज्या चित्रामध्यें सृष्टीचा संदेश स्पष्टपणें व्यक्त केलेला असतो, ज्या चित्रामुळें आपल्या मनामध्यें उच्च ध्येयाचें बीजारोपण होतें, तें चित्र ठळक रंगानें रंगविलेलें नसलें तरी उत्तम चित्र होय; परंतु ज्या चित्रामध्यें ‘ सृष्टि-

संदेश ' व्यक्त केलेला नसून नुसतें चित्र मात्र ठळक रंगानें रंगविलेलें आहे तें खरें चित्र नव्हें.

अशा प्रकारें चित्रकलेचे तीन सिद्धांत सांगितल्यावर चित्रकला जाणणाऱ्या उत्तम मर्मज्ञाविषयीं त्यांनीं उल्लेख केला आहे. ज्या मनुष्याच्या अंगीं सृष्टींतील संदेश ग्रहण करण्याची व त्या संदेशापासून आपल्या मानसिक उन्नतीवर योग्य परिणाम करून घेण्याची अधिक पात्रता असेल तोच खरा मर्मज्ञ होय. अशा प्रकारें मानसिक उन्नति व चित्रकला यांचा एकमेकांशीं निकट संबंध आहे एवढेंच नव्हे, तर परस्परांवर एकमेकांचें अस्तित्व अवलंबून आहे, हें मत त्यांनीं प्रस्थापित केलें. उत्तम चित्रकाराचें ध्येय उच्च पाहिजे; त्याचे विचार प्रगल्भ पाहिजेत; असें असलें, तरच त्यास उत्तम चित्र काढतां येईल, एरवीं काढतां यावयाचें नाहीं.

रस्किनच्या ह्या ग्रंथाच्या पहिल्या भागानेंच मार्मिक टीकाकार व उत्तम लेखक म्हणून त्यांची ख्याति झाली. सन १८४४ मध्यें त्यांनीं आपल्या वडिलांबरोबर स्वित्झर्लंड-मध्यें प्रवास केला व तेथील दऱ्याखोऱ्यांविषयीं माहिती मिळविली. परत येतांना त्यांनीं पॅरीस शहरीं कांहीं दिवस घालविले. त्यानंतर पुढच्याच वर्षीं ते एकटे प्रवासास निघाले. प्रवासांत असतांना त्यांनीं शेक्सपियरच्या नाटकांचें अध्ययन केलें. त्यानंतर डान्टे, जॉर्ज हर्बर्ट, वर्ड्सवर्थ, कार्लाइल यांच्या ग्रंथांशीं त्यांनीं परिचय करून घेतला.

व्हेनीसमध्यें असतांना टिंटोरेटो नांवाच्या नामांकित चित्रकाराचीं चित्रें त्यांनीं पाहिलीं. तसेंच, व्हेरोनीस, बेलिनी वगैरे प्राचीन चित्रकारांच्या कृति त्यांस पहावयास मिळाल्यामुळें प्राचीन चित्रकारांच्या कौशल्यासंबंधानें त्यांचा गैरसमज दूर झाला. टर्नरच्या अगोदर देखील पुष्कळ नामांकित चित्रकार होऊन गेलेले पाहून, ह्या प्राचीन चित्रकारांशीं लोकांची ओळख करून देण्यासाठीं त्यांनीं 'आधुनिक चित्रकार' ह्या ग्रंथाचा दुसरा भाग लिहिण्याचें मनांत आणलें. ह्या ग्रंथामध्यें आधुनिक चित्रकारांच्या समर्थनापेक्षां प्राचीन चित्रकारांचीच स्तुति केली आहे.

जॉननीं आपल्या मातापितरांबरोबर आल्पस् पर्वताकडे पुनः एकदां प्रवास केला. ह्या प्रवासांत त्यांनीं शिल्पकलेसंबंधानें सर्व माहिती जमविली, व त्यासंबंधानें एक ग्रंथ लिहिण्याचें मनांत आणलें. प्रवासाहून परत आल्यावर त्यांचें युफेमिया ग्रे नांवाच्या मुलीशीं लग्न झालें; परंतु ह्या लग्नापासून त्यांस सुख मिळालें नाहीं. दोघांच्या रुचि भिन्न असल्यामुळें त्यांचें एकमेकांशीं पटेना. एकीकडे रस्कीनची साधी रहाणी व थोर विचार, व दुसरीकडे युफेमिया हिची छानछोकीनें रहाण्याची आवड, असा प्रकार असल्यामुळें त्यांस एकमेकांपासून सुख झालें नाहीं. युफेमिया हिचा वाचनाकडे मुळींच कल नव्हता व तिला नेहमीं लंडनसारख्या शहरीं रहाणें आवडे. याचे उलट रस्कीनला 'हर्नहिल' सारख्या

मोकळया हवेच्या ठिकाणीं राहिल्यावांचून चालेना. अशा प्रकारें सर्वच बाबतींत त्यांच्या रुचि भिन्न पडल्यामुळें त्यांच्या लग्नाचा शेवट दुःखपर्यवसायी झाला.

मध्यंतरींच्या काळांत रस्कीनचे लेखनप्रयत्न चालूच होते. आल्पस् पर्वताकडे केलेल्या प्रवासांतील माहितीवरून त्यांनीं 'शिल्पकलेचें दीपसप्तक' ( Seven Lamps of Architecture ) ह्या नांवाचा एक ग्रंथ लिहिला. ह्या ग्रंथामध्यें चित्रकार व शिल्पकार या दोघांचेंही ध्येय एकच आहे हें त्यांनीं दाखविलें. सत्य, सौंदर्य, सामर्थ्य, त्याग, आज्ञापालन, श्रम, व स्मृति ह्या गुणसप्तकानें जी शिल्पकला साध्य करण्यांत येते तीच शिल्पकला चिरस्थाई होय. हा ग्रंथही रस्कीनच्या इतर ग्रंथांप्रमाणें लोकादरास पात्र झाला. ह्या ग्रंथामध्यें रस्कीनच्या उत्तमोत्तम वचनांपैकीं किती तरी वचनें आहेत. ह्या ग्रंथाबद्दल शार्लोटी ब्रॉन्टी म्हणते, "हा ग्रंथ म्हणजे शिल्पकलेवर उज्वल प्रकाश पाडणारें तारकासप्तकच होय."

ह्यानंतर त्यांनीं 'व्हेनीसममधील शिला' हा ग्रंथ १८५२ मध्यें लिहिला. त्यांनीं आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीं व्हेनीसकडे प्रवास केला होता. बायरनची कविता वाचून व्हेनीसमधील संगमरवरी तट पाहाण्याची त्यांस उत्कंठा झाली. ते एके ठिकाणीं म्हणतात, "राष्ट्रांतील सर्व लोक सुखी असले, त्यांचीं करमणुकीचीं साधनें उच्च प्रकारचीं असलीं,

लोकांमध्यें एकमेकांविषयीं प्रेमभाव असला, तरच त्यीं राष्ट्रांत शिल्पकलेचे उत्तम नमुने अधिकाधिक पहावयास सांपडतील. राष्ट्रांतील सर्व लोक सुखी असून केवळ मजेसाठीं किंवा करमणुकीसाठीं जेव्हां ते कलाकौशल्याच्या कामांत गढून गेलेले असतात, तेव्हांच कलाकौशल्याचें काम खरोखर प्रेक्षणीय ठरेल. रस्कीनच्या वरील मतामध्येंच, त्यांच्या यानंतर लिहिलेल्या समाजशास्त्र व अर्थशास्त्र ह्या ग्रंथांतील तत्त्वें सांपडतात."

'व्हेनीसमधील शिला' हा ग्रंथ संपविल्यावर 'आधुनिक चित्रकार' ह्या ग्रंथाचे पुढील भाग लिहिण्याच्या तयारीस ते लागले; परंतु ह्यापुढील भागांसाठीं सामुग्री जमविण्याचें काम त्यांनीं पूर्वींपासूनच सुरू केलें होतें. स्वित्झर्लंड येथें असतांना ह्या भागांसाठीं त्यांनीं टिपणें करून घेतलीं होतीं. सन १८४५ व १८४६ हीं दोन वर्षें त्यांनीं ह्या ग्रंथासंबंधानें सर्व प्रकारची माहिती जमविण्याच्या कामीं घालविलीं व ही सर्व सामुग्री घेऊन संगतवार रीतीनें ग्रंथ लिहिण्याचें काम घरीं आल्यावर केलें. अशा रीतीनें तिसरा व चौथा हे भाग त्यांनीं लिहिले.

रस्कीन आपल्या 'आधुनिक चित्रकार' ह्या ग्रंथासंबंधानें म्हणतात, "प्रस्तुत ग्रंथामध्यें मनुष्यनिर्मित सौंदर्यास ईश्वरनिर्मित सौंदर्याच्या कसोटीस लावण्याचा माझा उद्देश होता." ह्या ग्रंथासंबंधानें मोठमोठ्या टीकाकारांनीं प्रशंसा-

पर उद्गार काढले आहेत. “रस्कीन हा एक कलामर्मज्ञ आहे. त्यानें आपल्या ग्रंथांच्या योगानें कला ही कोणत्याही एका समाजास, व्यक्तीस, व राष्ट्रास वाहिलेली नसून ती उद्योगप्रिय समाजास, व्यक्तीस व राष्ट्रास दीर्घ प्रयत्नानें साध्य करून घेण्यासारखी गोष्ट आहे, हें सिद्ध केलें आहे.” अशा अर्थाचे ते उद्गार आहेत.

रस्कीनच्या जीवनवृत्तांतील पुढील हकीगत सांगण्या-पूर्वी त्यांनीं ह्या सुमारास ज्या कित्येक चळवळींस मदत केली; ठिकठिकाणीं व्याख्यानें देऊन लहान लहान पुस्तकें प्रसिद्ध केलीं; समाजशास्त्राचा अभ्यास करीत असतांना त्यांतील भ्रामक व चुकीच्या तत्त्वांमुळें लोकांची दिशाभूल होऊन मनुष्यप्राणी हा एक चालतेंबोलतें यंत्र कसें बनत चालला आहे हें पाहून, त्यांना ह्या भ्रामक तत्त्वांपासून वांच-विणें हेंच आपलें जीवनकार्य आहे असें वाटून त्यांचे तत्प्री-त्यर्थ कसे प्रयत्न सुरू झाले होते, ह्यांचा उल्लेख करूं.

सन १८५१ च्या सुमारास रस्कीननीं “Construction of Sheepfold” असें चमत्कारिक नांव देऊन एक पुस्तक लिहिलें. ह्या पुस्तकामध्यें सर्व प्रॉटेस्टंटांनीं आपल्यां-तील क्षुल्लक मतभेद विसरून एकमेकांशीं प्रेमभावानें वाग-ण्याविषयीं सूचना केली आहे. सन १८५७ मध्यें त्यांनीं ‘चित्रकलेचीं मूलतत्त्वें’ हें पुस्तक लिहिलें. ह्या पुस्तकामध्यें

चित्रकलेसंबंधानें मुद्देसूद माहिती दिली आहे. पुढें 'Harbours of England' ( इंग्लंडचीं बंदरें ) हें पुस्तक त्यांनीं प्रसिद्ध केलें.

सन १८५७ च्या सुमारास मिलाईस व होलमन यांच्या-कडून चित्रांचें एक जंगी प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें, व त्यावर लंडन टाइम्समध्यें टीका झाली होती. रस्कीननीं त्या टीकेस प्रत्युत्तर दिलें इतकेंच नव्हे, तर आपल्या ' आधुनिक चित्रकार ' ह्या ग्रंथाच्या नवीन आवृत्तींत होतकरू चित्रकारांचा उल्लेख करून त्यांस उत्तेजनही दिलें. मध्यंतरीं सन १८५१ मध्यें टर्नर हा चित्रकार वारला. त्याच्या एकंदर १९००० चित्रांचें काळजीपूर्वक निरीक्षण करून रस्कीननीं ' रॉयल गॅलरी ' मध्यें त्यांतील उत्तम चित्रांची व्यवस्थेनें मांडणी केली.

' Construction of Sheepfold ' या पुस्तकामुळें त्यांची व मॉरिस नांवाच्या एका गृहस्थांची ओळख झाली. धार्मिक बाबतींमध्यें जरी रस्कीनला मॉरिस ह्यांचीं मतें आवडत नसत, तरी मॉरिस ह्यांचे कामकरीवर्गाची स्थिति सुधारण्याच्या कामीं चाललेले प्रयत्न पाहून रस्कीननीं त्यांस मदत केली. ह्याच वेळीं मजूरवर्गासाठीं एक विद्यालय मॉरिस, किंगस्ले वगैरे गृहस्थांच्या पुढाकारानें स्थापण्यांत आलें, व ज्या मजूरवर्गास धंद्यामुळें उच्च शिक्षण घेणें शक्य

नव्हतें त्यांस ह्या विद्यालयामध्यें, तशाप्रकारचें उच्च शिक्षण देण्याची तरतूद करण्यांत आली.

मध्यंतरींच्या काळांत रस्कीनचें समाजनिरीक्षण सुरू होतेंच. समाजशास्त्राचें अध्ययन करून त्यांतील निरनिराळ्या वर्गांविषयीं त्यांनीं विचार केला. मजूरवर्गाची स्थिति पाहून त्यांस फार वाईट वाटलें. पोटासाठीं त्यांस सर्व दिवसभर खपावें लागत असल्यामुळें सृष्टिसौंदर्य, सृष्टिचमत्कार वगैरे पाहातां येणें त्यांस कसें शक्य नसतें हें त्यांस कळून आलें राष्ट्रांतील बहुजनसमाजाची अशा प्रकारची दुःस्थिति असतां आपण इतकीं वर्षे सृष्टिवर्णनें लिहिण्यांत फुकट घालविलीं असें त्यांस वाटलें. आपण लिहिलेल्या ग्रंथांपैकीं एक वाक्यही अशा कष्टमय स्थितींतील लोकांस समजणें कसें अशक्य आहे हें त्यांस समजलें. अशा रीतीनें समाजाचें सूक्ष्म निरीक्षण केल्यामुळें त्यांच्या जीवनवृत्तांतांतील पुढील कार्यक्रम एकदम बदलला. आपलें राहिलेलें आयुष्य गरीब लोकांची स्थिति सुधारण्याच्या कामीं खर्च करावयाचें असा त्यांनीं दृढनिश्चय केला. समाजांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें असलेल्या भेदांबद्दल, व त्यांच्या स्थितीबद्दल मोठमोठे समाजशास्त्रज्ञ व अर्थशास्त्रवेत्ते काय म्हणतात, ह्या महत्त्वाच्या विषयांसंबंधानें त्यांनीं आपल्या ग्रंथांत कांहीं उलगडा केला आहे कीं नाहीं, हें पाहण्यासाठीं त्यांनीं मिल्ल, रिकार्डो वगैरे अर्थशास्त्रज्ञांच्या ग्रंथांचें अध्ययन केलें. हे ग्रंथ

वाचून त्यांची फारच निराशा झाली. कारण, अशा प्रकारच्या महत्त्वाच्या प्रश्नासंबंधानें त्या ग्रंथकारांनीं सर्व बाजूंनीं विचारच केलेला नव्हता. समाजांतील निरनिराळ्या वर्गांमध्यें परस्परांविषयीं प्रेमभाव न उद्भवतां मत्सर कां उद्भवतो व हा मत्सरभाव नाहींसा होण्यास उपाय काय, ह्याचें समर्पक उत्तर त्यांस समाजशास्त्रावरील व अर्थशास्त्रावरील मोठमोठ्या ग्रंथांमध्यें देखील मिळेना. हल्लींचे अर्थशास्त्र म्हणजे पुष्कळ लोकांवर जुलूम व अन्याय करून 'येन केन प्रकारेण' कायद्याच्या तावडींत न सांपडतां पैका मिळविण्याचें शास्त्र आहे हें पाहून त्यांस फार वाईट वाटलें. हल्लींच्या अर्थशास्त्रानें मनुष्यप्राण्यास एक 'यंत्रच' बनविलें आहे; त्यास विचार करण्याची कांहींच शक्ति नाहीं; त्यांस मनोभावना नाहींत; सर्व मनुष्यप्राणी एकमेकांविषयीं द्वेषबुद्धि बाळगणारे प्राणी आहेत, वगैरे चुकीच्या समजुतीवर अर्थशास्त्राची इमारत बांधल्यामुळें ती इमारत आज नाहीं उद्यां ढांसळून पडलीच पाहिजे; यासाठीं अर्थशास्त्राच्या ह्या भ्रामक तत्त्वापासून समाजास कसें वळण द्यावें या गोष्टीच्या ते विचारास लागले. मनुष्यप्राणी हा एक यंत्र नसून त्याच्यामध्यें प्राण्याच्या अंगीं असणारीं सर्व लक्षणें आहेत; मनुष्यप्राण्यामध्यें कांहींतरी उच्चतम आहे; ह्या जगामध्यें मनुष्यप्राण्यास कांहींतरी कर्तव्य करावयाचें असतें; हें लक्षांत ठेवून अर्थशास्त्राची व समाजशास्त्राची

चिरस्थायी इमारत कशी रचावी ह्या विचारांनीं त्यांचें मन व्यग्र होऊन गेलें.

वरील तऱ्हेच्या विचारांमुळें रस्कीनच्या ह्यापुढील कार्यक्रमास निराळीच दिशा मिळाली. त्यांनीं साहित्यक्षेत्रांत नांव मिळविलें होतें. कार्लाइल, ब्राऊनिंग, टेनिसन, वगैरे विद्वानांशीं त्यांनीं मैत्री संपादन केली होती. ह्यापुढील ३० वर्षें त्यांनीं ठिकठिकाणीं विविध विषयांवर व्याख्यानें देण्यांत घालविलीं.

इसवी सन १८०० पासून इंग्लंडमध्यें यांत्रिक युगास प्रारंभ झाला. नवीन सुरू झालेल्या या मन्वन्तरानें मजूर-वर्गाच्या स्थितीमध्यें बरीच क्रान्ति करून सोडली. यंत्राच्या साहाय्यानें थोड्या वेळांत पुष्कळ कामें होऊं लागल्यामुळें मजुरीचा दर कमी झाला. मजुरीमध्यें एकसारखा फरक पडत चालल्यामुळें मजूरवर्गास उद्यांचा दिवस कसा जातो याची काळजी वाटूं लागली. मजूर लोकांना थोड्या वेतनावर पुष्कळ तास काम करावें लागे. त्या वेळेस कारखाने व गिरण्या यांतील कामाच्या तासांसंबंधानें कांहींच कायदे नसल्यामुळें मजूरवर्गाची स्थिति फारच वाईट होती. ही त्यांची स्थिति पाहून जेव्हां समाजसेवक सुधारणा कर-ण्याचा प्रयत्न करूं लागले, त्या वेळेस भांडवलवाल्या लोकांनीं त्यांच्याविरुद्ध बरीच चळवळ सुरू केली. सरकारनें नवीन कायदे करून आमच्या धंद्यांत हात घालूं नये.

चढाओढ, देवघेव, ही जेव्हा नियमांनीं बांधलेली नसते त्यावेळसच राष्ट्राचा फायदा होतो, वगैरे मतें भांडवलवाले लोक व त्यांच्या बाजूचे अर्थशास्त्रज्ञ प्रतिपादन करूं लागले. भांडवलवाल्या लोकांच्या स्वार्थबुद्धीमुळें राष्ट्राची एकसारखी अवनति होत जाणार हें पाहून कार्लाइल, डिकन्स, चार्लस् किंगस्ले वगैरे पुढाऱ्यांनीं निरनिराळ्या तऱ्हेनें ग्रंथरचना करून गरीब मजूरवर्गाच्या उन्नतिप्रीत्यर्थ प्रयत्न केला. जॉन रस्कीन यांसही मजूरवर्गाची कष्टप्रद स्थिति पाहून फार वाईट वाटलें. मिल, रिकार्डो, वगैरे अर्थशास्त्रज्ञांच्या ग्रंथांचा त्यांनीं काळजीपूर्वक अभ्यास केला; व त्या ग्रंथांतील विचारसरणीमध्यें त्यांस ज्या चुका आढळल्या त्यावर टीका करण्याचें त्यांनीं मनांत आणलें.

या कामासाठीं त्यांनीं प्रसिद्ध कादंबरीकार थॅकरे यांच्या संपादकत्वाखालीं चाललेल्या ‘ कार्नहिल ’ मासिक पुस्तकामध्यें एक लेखमाला सुरू केली. ही लेखमाला म्हणजे अर्थशास्त्रावर सोडलेलें एक अस्त्रच होय. ह्या लेखमालेविरुद्ध भांडवलवाल्या वर्गणीदारांनीं बरेंच काहूर केल्यामुळें ह्या मालेचे पहिले चार लेख प्रसिद्ध झाल्यावर ही लेखमाला थांबविणें भाग पडलें.

पुढें हे लेख ‘ Unto this Last ’ ह्या नांवानें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाले. ह्या पुस्तकामध्यें प्रथम समाजांतील निरनिराळ्या वर्गावर कोणती जबाबदारी आहे, व ती योग्य

प्रकारें बजाविण्यास त्यांनीं कसें तत्पर झालें पाहिजे, ह्याविषयीं विवेचन केलें आहे. कोणत्याही राष्ट्राची भरभराट होण्यास त्यांतील निरनिराळे धंदे करणाऱ्या लोकांमध्यें एकमेकांविषयीं सहानुभूति असली पाहिजे, राष्ट्रांतील लोकांना अर्थात् व्यापारी वर्गाला राष्ट्राच्या उन्नतीसाठीं एक प्रकारचें कर्तव्य करावयाचें असतें; तें कर्तव्य म्हणजे राष्ट्रास सर्व प्रकारचे जिन्नस योग्य भावानें पुरविणें हें होय. व्यापारी वर्गानेंही राष्ट्रावर अनर्थ आला असतां आपली संपत्तिच काय पण प्राणही खर्च करण्यास तयार झालें पाहिजे. आपण मोठमोठ्या राष्ट्रांचा इतिहास वाचला म्हणजे ज्यांनीं आपल्या देशासाठीं आपलें सर्वस्व खर्च केलें अशांचीं कितीतरी उदाहरणें सांपडतात, व तीं वीररत्नें आपणांस मार्गदर्शक होतात; परंतु ज्यांनीं एखाद्या दुष्काळाच्या प्रसंगीं गरीब लोकांच्या संरक्षणार्थ आपली सर्व संपत्ति खर्च केली अशा व्यापारी मनुष्यांचीं उदाहरणें सांपडूं नयेत म्हणजे नवल नव्हे काय ? रस्कीन म्हणतात कीं, ह्याचें कारण जर आपण पाहूं लागलों, तर व्यापारी लोक म्हणजे स्वार्थसाधु, आपमतलबी, अशी सार्वत्रिक समजूत असल्यामुळें थोर विचारांचे गृहस्थ ह्या धंद्याकडे वळत नाहींत. व्यापाराचा धंदा करून स्वार्थत्याग करणें त्यांस अशक्य वाटतें. अशा प्रकारें स्वार्थसाधु व कोत्या विचाराचे लोकच ह्या धंद्यांत पडल्यामुळें त्यांनीं आपणाबरोबर ह्या प्रामाणिक व अब्रूच्या धंद्यासहि काळिमा आणला आहे. कारखान्यांतील मजूरांमध्यें आपल्या माल-

काविषयीं प्रेम व आदर असूं नये ही खरोखर लाजिरवाणी गोष्ट आहे. ह्याचें कारण आपण जर पाहूं लागलों तर मालकाची आपल्या मजूरांविषयीं व त्यांच्या स्थितीविषयीं असलेली निष्काळजी हेंच आढळून येईल. मालकांनीं आपल्या कारखान्यांतील मजूर लोकांबद्दल योग्य सहानुभूति दाखविली तर मजूरलोकांसहि आपल्या मालकाविषयीं आदर व प्रेम वाटेल, व ते आपल्या कारखान्याच्या उन्नतीप्रीत्यर्थ प्रयत्न करतील. गोड बोलून जें काम होतें तें बळजबरीनें मारून मुटकून कामास लावलेल्या मजुराकडून होत नसतें, हें कारखान्याच्या मालकांनीं लक्षांत ठेविलें पाहिजे.

नंतर खरा श्रीमंत कोण, व संपत्तीचा उगम कोठून होतो ह्याविषयीं विवेचन केलें आहे. रस्कीन म्हणतात, " श्रीमंती हा एक स्वतंत्र शब्द नसून तो त्याच्या उलट असलेल्या गरीबी ह्या शब्दावर अवलंबून आहे; म्हणूनच सर्वांस श्रीमंत होणें शक्य नाहीं. हल्लींच्या अर्थशास्त्राप्रमाणें आपण श्रीमंत होणें म्हणजे आपल्या शेजाऱ्यास गरीबींत ठेवणें होय. ज्या राष्ट्रांतील लोकांमध्यें एकमेकांविषयीं प्रेमभाव—बंधुभाव असेल, राष्ट्राची उन्नति व्हावी अशी जेव्हां त्यांतील प्रत्येक माणसाची इच्छा असेल, तेव्हांच तें राष्ट्र खरोखर श्रीमंत होईल."

रस्कीननीं व्यापारी लोकांच्या एका तत्त्वावरही कडक टीका केली आहे. तें तत्त्व म्हणजे ' स्वस्त दरानें माल

विकत घ्या व महाग दरानें विका.' ते म्हणतात, "ह्या तत्त्वामुळें कदाचित् एखादा मनुष्य इतर मनुष्यांचें नुकसान करून श्रीमंत होत असेल, परंतु ह्या तत्त्वामुळें सर्व राष्ट्राची अवनतिच होत आहे. काय, स्वस्त दरानें माल विकत घ्या ? होय, पण माल स्वस्त होण्याचें कारण काय याचा आधीं विचार केला आहे काय ? तुमच्या घरास आज आग लागली म्हणजे उद्यां कोळसे स्वस्त होतील, किंवा धरणी-कंपानें घर पडलें म्हणजे विटा स्वस्त मिळतील, म्हणजे 'धरणीकंप व आग' हा कांहीं राष्ट्रीय फायदा नव्हे." अशा प्रकारें आपल्या 'Unto this last' ह्या पुस्तकामध्यें रस्किननीं अर्थशास्त्रावर टीका करून अर्थ-शास्त्रास एक नवीन दिशा दाखवून दिली. रस्कीनला त्याच्या सर्व पुस्तकांत हें पुस्तक अधिक प्रिय होतें.

हें पुस्तक प्रसिद्ध झाल्यावर रस्कीन समाजसेवक व समाजसुधारक म्हणून पुढें आले. पुढें लवकरच ते पुनः एकदा आल्पस् पर्वताच्या प्रवासास गेले. तेथें असतांना त्यांनीं अर्थशास्त्रावरील आपली दुसरी लेखमाला लिहिण्यास प्रारंभ केला. तिचे पहिले तीन लेख प्रसिद्ध झाल्यावर 'फ्रेझर्स' मासिकपुस्तकाच्या संपादकासही ती लेखमाला बंद ठेवणें भाग पडलें. ही लेखमाला Munera Pulveris ह्या नांवानें पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली. ह्या पुस्तकांत हल्लींच्या यांत्रिक युगामुळें निरनिराळ्या धंद्यांतील लोकांच्या

स्थितीमध्यें जे दोष दिसून येतात ते नाहींसे करण्यासाठीं कांहीं उपाय सुचविले आहेत. ह्या लेखमालेविरुद्धही तत्का-लीन अर्थशास्त्रज्ञांनीं टीका केली. रस्कीननें कलामर्मज्ञ म्हणून मिळविलेलें नांव समाजावर टीका करून घालवावें हें त्यांच्या आईबापांस आवडलें नाहीं. जेम्ससाहेबांस आपल्या मुलाचीं सामाजिक मतें आवडत नसत. रस्कीनचेंही आपल्या वडिलांशीं धार्मिक बाबतींत पटत नसे. त्यांची धर्मविषयींची पूर्वींची संकुचित बुद्धि जाऊन सर्व धर्मांचा सहानुभूतीनें विचार करण्याची संवय त्यांस लागली होती.

रस्कीनच्या ह्या दोन्ही ग्रंथांसंबंधानें तत्कालीन लोकां-मध्यें खळबळ उडून बरीच टीका झाली. ह्या दोन्ही ग्रंथां-संबंधानें प्रसिद्ध ग्रंथकार कार्लाइल म्हणतात, "ह्या ग्रंथां-मध्यें उदात्त विचार आढळून येतात. यांत असा एकही मुद्दा नाहीं कीं, ज्याबद्दल माझा मतभेद आहे." रस्की-नच्या ग्रंथावर झालेल्या टीकांबद्दल कार्लाइल एका दृष्टां-तांच्या द्वारें म्हणतात, "ज्या वेळेस सालोमननें भव्य देवालय बांधण्यास प्रारंभ केला, त्या वेळेस शेजारच्या झाडावर असलेल्या कितीतरी चिमण्यांनीं मोठा गोंगाट करून असें वर्तविलें कीं, ह्या देवालयाची रचना अगदीं चुकली आहे. ह्याची रचना लोकमताविरुद्ध आहे. अशा रीतीनें देवालयाचें काम कधींही संपणार नाहीं. परंतु जेव्हां देवालय बांधण्याचें काम संपलें, त्या वेळेस सर्व चिमण्या

लांब उडून गेल्या व दुसऱ्या एका गोष्टीबद्दल असाच गोंगाट करूं लागल्या. ” Munera Pulveris ही लेखमाला आल्पस् पर्वताकडे असतांनाच लिहिण्यास प्रारंभ केला होता, हें वर सांगितलेंच आहे. ही लेखमाला लिहिल्या वेळेपासून त्यांच्या चित्तास कोणत्याही गोष्टींत गोडी वाटेना, म्हणून ते परत घरीं आले. लवकरच सन १८६४ सालीं त्यांचे वडील वारले. त्यांनीं आपल्या मुलासाठीं दोन लक्ष पौंड ठेविले होते. ह्या संपत्तीचा विनियोग रस्कीननीं देशबांधवांची स्थिति सुधारण्याचे कामीं केला. आपल्या संपत्तीपैकीं १७००० पौंड त्यांनीं आपल्या आप्तेष्टांस दिले. बाकीच्या संपत्तीचा विनियोग त्यांनीं पदार्थसंग्रहालयासाठीं, गरीब लोकांसाठीं शाळा काढण्यास, व चित्रकला व शिल्पकला यांच्या शाळा काढण्याचे कामीं केला. आपण शिकविलेल्या प्रमेयांचा प्रयोग करून पाहण्यासाठीं त्यांनीं आपली सर्व संपत्ति खर्च केली; व आपण स्वतः, आपण लिहिलेल्या पुस्तकांच्या प्राप्तीवर म्हणजे ४००० पौंडाच्या उत्पन्नावर राहूं लागले. ह्या कृत्यासंबंधानें एक चरित्रलेखक विनोदानें म्हणतो, “ रस्कीनच्या या उधळेपणाबद्दल लोक त्यांना हंसतात. परंतु जर त्यांनीं हे सर्व पैसे मनुष्यजातीच्या उन्नतीप्रीत्यर्थ, त्यांना शिक्षण देण्याचे कामीं खर्च न करतां घोडे खरेदी करण्याच्या कामीं खर्च केले असते तर लोकांनीं त्यांची वाहवा केली असती. ”

वडील वारल्यावर रस्कीन आपल्या मातेवर अधिक ममता करूं लागले. इ० स० १८६६ पासून १८६९ पर्यंत त्यांनीं आपल्या मित्रमंडळीबरोबर सर्व युरोपखंडांत प्रवास केला. ह्या वेळेपासून त्यांनीं ठिकठिकाणीं व्याख्यानें देण्यास सुरुवात केली. ह्या व्याख्यानांचा विषय काव्य, वाङ्मय, धर्म, चित्रकला, शिल्पकला वगैरे कोणताही असला तरी त्यामध्यें समाजाविषयीं मुख्यत्वें टीका केलेली असे. या व्याख्यानांपैकीं 'Sesame and Lilies' व 'Crown of Wild Olive' हीं व्याख्यानें विशेष प्रसिद्ध आहेत.

यांपैकीं पहिलें व्याख्यान १८६५ मध्यें मँचेस्टरमध्यें दिलें. ह्या व्याख्यानामध्यें पुस्तकें व त्यांचें वाचन ह्याविषयीं विचार प्रगट केले आहेत. रस्कीन ह्मणतात, आपलें वाङ्मयोद्यान सुंदर आहे, विस्तृत आहे. ह्या उद्यानामध्यें आपल्यांतील कितीतरी थोर विचारांच्या महात्म्यांनीं आपलें ज्ञान, आपला जगांतला अनुभव पुस्तकरूपानें सांठवून ठेविला आहे. त्यांच्या ज्ञानाचा—अनुभवाचा—जर आपणास फायदा करून घ्यावयाचा असेल, तर आपण त्यांचे ग्रंथ काळजीपूर्वक वाचले पाहिजेत. आपल्या मनांतील पूर्वग्रह, गैरसमज दूर करून त्यांच्या ग्रंथांचें आपण अध्ययन केलें पाहिजे. आपल्या वाङ्मयोद्यानांत शिरण्यास कोणासही मज्जाव नाहीं. मनुष्य श्रीमंत असो किंवा गरीब असो, त्याला ह्या वाङ्मयोद्यानांत शिरून त्यांतील सुगंधी पुष्पांचा आस्वाद

घेतां येईल. मात्र त्यांच्याजवळ एक परवाना पाहिजे; तो परवाना म्हणजे आस्वाद घेण्याची आवड, उत्तम पुस्तकांतील संदेश ग्रहण करण्याची इच्छा—हा होय. आपलें ह्या जगांतील वास्तव्य चिरकाल नाहीं, तेव्हां ह्या थोड्या वेळांत वाईट पुस्तकें वाचण्याच्या नादीं न लागतां आपण उत्तमोत्तम पुस्तकेंच वाचलीं पाहिजेत. त्यांतील उपदेश आपल्या हृत्पटलावर खोदून ठेविला पाहिजे. जो मनुष्य पुस्तकांतील सदुपदेश आपल्या अंतःकरणावर खोदून ठेवून तद्वत् आपलें आचरण ठेवितो तोच खरा सुशिक्षित होय. नुसत्या पुस्तकी ज्ञानानें मनुष्य चालताबोलता ‘ कोश ’ होईल; परंतु सुशिक्षित होणार नाहीं. ज्या मनुष्याचें अंतःकरण आपल्यापेक्षां वाईट स्थितींतील लोकांबद्दल तुटत असेल, त्यांची स्थिति सुधारण्याचे कामीं आपलें तनुमनधन खर्च करण्यासही जो मनुष्य मागेंपुढें पाहणार नाहीं, तोच खरा सुशिक्षित होय.

“ Lilies ” ह्या व्याख्यानांत समाजांत स्त्रियांचा दर्जा कोणता मानण्यांत येतो व तो वास्तविक कोणता असावयास पाहिजे, ह्याविषयीं विवेचन केलें आहे. स्त्रीजात ही पुरुषजातीची अंकित, पुरुषजातीची सेवा करणारी जात, थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे पुरुषजात ही स्त्रीजातीपेक्षां सर्व तऱ्हेनें श्रेष्ठ आहे ही समजूतच चुकीची आहे, व ह्या चुकीच्या समजुतीमुळेंच स्त्रीजातीची अवनति होत आहे, ह्या तत्त्वांचें त्यांत प्रतिपादन केलें आहे. रस्कीन म्हणतात,

" एखाद्या जातीस दुसऱ्या जातीपेक्षां श्रेष्ठ म्हणणें मूर्ख-पणाचें आहे. ह्या जगामध्यें पुरुषजातीस ज्याप्रमाणें कर्तव्य करावयाचें आहे, त्याप्रमाणें स्त्रीजातीसही कर्तव्य करा-वयाचें आहे. दोन्ही जातींमध्यें एकमेकांविषयीं सहानु-भूति पाहिजे. पुरुषजातीस जगांतील संकटांस तोंड द्यावयाचें असतें, त्याचप्रमाणें स्त्रीजातीसही घरांतील संकटांशीं झग-डून त्यांची योग्य व्यवस्था लावावयाची असते. निरनिराळ्या देशांचे पुरातन ग्रंथ आपण चाळून पाहिल्यास आपणांस असें आढळून येईल कीं, पहिल्याप्रथम पुरुषजातच वाईट मार्गास लागते व स्त्रीजात आपल्यांतील दैवी गुणानें त्यांना ताळ्यावर आणते. पुरुषजातीस अनेक संकटांशीं झगडावें लागत असल्यामुळें त्यांची दिशाभूल होण्याचा बराच संभव असतो, व त्यांस योग्य मार्गावर आणण्याचें काम करण्यास जर कोणी समर्थ असेल तर ती स्त्रीजातच होय. त्यानंतर स्त्रियांस कोणतें शिक्षण द्यावें ह्याविषयीं त्यांनीं विवेचन केलें आहे. कादंबऱ्या वाचण्याच्याविरुद्ध रस्कीननीं आपलें मत दिलें आहे. कारण कादंबऱ्यांच्या वाचनानें (अर्थात् वाईट कादंबऱ्यांच्या वाचनानें ) येणारा काल्पनिक गोष्टींचा हव्यास वाढून आपलें नेहमींचें जीवित दुःखमय वाटतें असें त्यांचें म्हणणें आहे.

इ. स. १८६७ रस्कीनची केम्ब्रीज येथें अध्यापकाच्या जागीं नेमणूक झाली, व १८७२ मध्यें त्यांना ऑक्सफोर्ड येथें

प्रोफेसर नेमण्यांत आलें. मध्यंतरीं १८८१ च्या सुमारास त्यांनीं इंग्लंडच्या कामकरीवर्गास उद्देशून पत्रें लिहिण्यास प्रारंभ केला. हा त्यांचा क्रम सतत ९ वर्षें चालू होता. हीं पत्रें पुढें पुस्तकरूपानें 'Fors Clavigera' ह्या नांवानें प्रसिद्ध झालीं. ह्यांत कामकरीवर्गास आपलें काम प्रामाणिकपणें करून कलाकौशल्याच्या कामांत कसें पडतां येईल ह्याविषयीं विवेचन केलें आहे. प्रत्येक मनुष्य ज्या वेळेस आपलें काम प्रामाणिकपणानें बजावील त्या वेळेसच त्याचें जीवित सुखमय होईल, एरवीं होणार नाहीं. हीं पत्रें साध्या भाषेंत लिहिलेलीं आहेत, तरी त्यांमध्यें ठिकाठकाणीं विनोद, अलंकार व वक्रोक्ति, उपरोधक भाषा, गांभीर्य वगैरे भाषाशास्त्राचे निरनिराळे अलंकार असल्यामुळें वाचकांच्या मनावर निरनिराळे विकार उमटतात; व वाईट चालरीतीविरुद्ध धर्मयुद्ध करण्यास आपल्या मनास प्रेरणा होते. रस्कीनच्या ह्या पुस्तकासंबंधानें एक टीकाकार म्हणतो, " शेक्सपियरचें जसें हॅम्लेट नाटक, तसेंच रस्कीनचें हें पुस्तक होय. "

ह्यानंतर रस्कीननें लिहिलेलें मोठें पुस्तक म्हणजे Prœterita अथवा 'गतकालीन आठवण' हें होय. ह्या पुस्तकामध्यें त्यांनीं आपल्या लहानपणाच्या आठवणी, आपली मित्रमंडळी, आपले आवडते ग्रंथ, आपले खेळण्याचे प्रकार वगैरे गोष्टींविषयीं लिहिलें आहे. ह्या पुस्तकाची भाषा अगदीं साधी आहे. मनांत जे विचार आले ते जसेच्यातसे लिहिले

असल्यामुळें हें पुस्तक वाचून रस्कीनच्या उदार अंतःकरणाची खरी ओळख पटते.

वरील पुस्तक लिहिल्यानंतर म्हणजे १८८९ सालीं रस्कीननीं साहित्यक्षेत्रांतून व लोकसेवेंतून आपलें अंग काढून घेतलें; व आपलें राहिलेलें आयुष्य ब्रँटवुड येथें शांततेनें काढण्याचा विचार केला. ब्रँटवुडसारख्या शांततेच्या ठिकाणीं जरी बाहेरून शांतता होती तरी रस्कीनला मनःस्वस्थता मुळींच नव्हती. दिवसेंदिवस एखाद्या कष्टी, दुःखी माणसाप्रमाणें त्यांचें वर्तन असे. ते नेहमीं एकलकोंडे व उदास असत. ऐन उमेदीच्या काळीं त्यांनीं आपल्या सुखावर पाणी सोडलें होतें, व हल्लीं त्यांच्या मनामध्यें आपल्या वाईट स्थितीबद्दलचेच विचार घोळत असल्यामुळें त्यांस मनःस्वस्थता मिळाली नाहीं. १८९९ मध्यें म्हणजे रस्कीनच्या ८० व्या वाढदिवशीं त्यांस ऑक्स्फोर्ड युनिव्हर्सिटी व मोठमोठ्या विद्वान् लोकांकडून आयुरारोग्य इच्छिणारीं अनेक पत्रें आलीं; परंतु ईश्वरी संकेत निराळाच असल्यामुळें जॉन रस्कीन यांना १८ जानेवारी १९०० मध्यें परलोकीं प्रयाण करावें लागलें. कॉनिस्टिन शहरच्या चर्चयार्डमध्यें ह्याचें थडगें बांधलें असून त्यावर त्यांच्या आवडत्या 'Unto this Last' ह्या पुस्तकाचें नांव कोरलें आहे.

असो. आमचे चरित्रनायक जॉन रस्किन यांचें जीवन-चरित्र येथें संपलें. आपल्या भारतवर्षास रस्किनसारख्या पुरुषांची फारच अवश्यकता आहे; व तसे ते निर्माण होऊन अज्ञानांधःकारांत पडलेल्या आम्हांस जागृत करतील अशी आशा बाळगण्यास मुळींच हरकत नाहीं.

---

हें पुस्तक मुंबई इलाखा, ( मध्यभाग ) येथील शाळांतून लायब्ररी पुस्तक व बक्षीस पुस्तक म्हणून व मध्यप्रांत व वऱ्हाड येथील शाळांतील लायब्ऱ्यांसाठीं मंजूर झालेलें आहे.

# युरोपचा अर्वाचीन इतिहास.

१४५३-१९२०

लेखकः-परशराम हरी बर्वे, बी. ए. ( ऑनर्स )

क्राऊन सोळा पेजी, पृष्ठें ३७१ कापडी बाइंडिंग.

**किंमत ३ रुपये.**

**कांहीं अभिप्राय.**

**चित्रमयजगत**—फ्रान्समधील राज्यक्रांति, राष्ट्रीय कल्पनांचा उदय व साम्राज्यवादामुळें युरोपियन राष्ट्रांत उत्पन्न झालेली तेढ वगैरे ऐतिहासिक गोष्टींची माहिती असल्यावांचून महायुद्धाचा व नंतर चाललेल्या घडामोडींचा नीटसा उलगडा होत नाहीं, तेव्हां तो करून घेण्यास या पुस्तकानें चांगली मदत होणार आहे.

**विविधज्ञानविस्तार**—प्रचलित युरोपियन राजकारण समजण्यास या पुस्तकाचा बराच उपयोग होईल.

**नवयुग**—हा सरळ व सोप्या भाषेंतील इतिहास मनोरंजक असून त्याचा विद्यार्थ्यांस चांगल्या प्रकारें उपयोग होईल.

**ज्ञानप्रकाश**—युरोपांतील आधुनिक सुधारणा व लोकशाहीचा अभ्युदय समजून घेण्यास हा ग्रंथ अत्यंत उपयोगी पडेल.

**रा. रा. नरसोपंत केळकर**—महायुद्धाचीं खरी कारणें लक्षांत येण्यास जुना इतिहास कळणें अवश्य आहे, पण निव्वळ मराठी वाचकांस युरोपचा इतिहास समजण्याचीं साधनें थोडीं आहेत. या पुस्तकानें या साधनांत चांगली भर पडेल यांत शंका नाहीं.

**[illegible]न कॉलेज मॅगझीन**—वर्तमानपत्रामध्यें दररोज प्रसिद्ध होणाऱ्या बातम्यांचें मर्म लक्षांत येण्यास युरोपच्या गेल्या चार पांच शतकांच्या इतिहासाचें स्थूल तऱ्हेचें ज्ञान लोकांस पुष्कळ सहाय्यकारक होण्यासारखें आहे. हें पुस्तक लिहून वरील ज्ञान पैदा करण्याचें सुलभ साधन निव्वळ मराठी जाणणाऱ्या लोकांसाठीं तयार केलें आहे.

( पुस्तकाच्या प्रती आर्यभूषण छापखाना, बुधवार पेठ, पुणें शहर येथें विकत मिळतील. )